# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०६.०५.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.०५/०५/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६२,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०५/०५/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ११,७७० /—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध्द दि.०५/०५/२०२५ १).पोस्टे सेनगाव येथे फिर्यादी शालीनी देवराव नाईक वय ४६ वर्ष व्य.नौकरी पोलीस निरीक्षक पोस्टे सेनगाव मो.नं.८४५९६६९११८ यांनी आरोपी नामे टिप्पर मालक नामदेव साळोजी मुंडे रा साखरा ता सेनगाव टिप्पर चालक नाव गाव माहीत नाही वर कलम ३०३(२)बि.एन.एस व सहकलम ४८(७)(८) गौण खनिज अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात आली यातील **गेला माल** :— १)२०,०००,०० एक हायवा टिप्पर पासींग क्र नसलेला पिवळया व सिल्वर रंगाचा २)१०,००० रू हायवा मध्ये अंदाजे ०२ ब्रास रेती किअ असा एकुन २०,१०,००० रू चा माल वेळी व ठिकाणी यातील रोडवर नर्सी फाटा येथे नाकाबंदी करीत असताांना नमुद आरोपीने स्वत:चे फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीर रित्या रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आला नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हे संगणमत करून रेतीची गौण खनीज चोरटी वाहतुक करीत असतांना वरील मुददेमाला सह मिळुन आले म्हणुन गुन्हा.

**सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ ( २००३) अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि.०५/०५/२०२५ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण ०४ ठिकाणी कलम ५/२२ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल १,३९०/— रू यातील आरोपी हा शासनाने विशिष्ट क्षेत्रामध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य वस्तु व सिगारेट बिडी जन्य पदार्थ साठवुन वितरीत करीत असतांना मिळुन आला सदर तंबाखुजन्य पदार्थाच्या पुडयावर चित्रमय रेखाटनासह वैधानिक इशारा छापलेला आहे तर काही पदार्थावर तो अस्पष्ट किंवा नियमान्वये ठरवुन दिलेल्या मापदंडप्रमाणे नव्हता अशा स्वरूपात प्रदर्शीत करून मिळुन आला म्हणुन गुन्हा.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.०५/०५/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द कलम २८५ भान्यासं एकुण ०२ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.